# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि – ४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनीयम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

विशेष मागासवर्ग कक्ष
एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५ फोन नं. ०७१३२ - २१६५९६

जावक क्रमांक : गों.वि./वि.मा.क./ ९६ /२०१९ दिनांक : १३/०१/२०१९

**तातडीचे**

**परिपत्रक**

विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अनुदानीत महाविद्यालयांचे प्राचार्य,

दिनांक ०३.११.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अनुदानीत महाविद्यालयांतील रिक्त पदे भरण्यासंदर्भात मा. शिक्षण मंत्री, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि. ०७.०१.२०१९ रोजी मुंबई येथे आयोजीत बैठकीत महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठातील कुलसचिवांना दिलेल्या दिशानिर्देशानुसार उपरोक्त शासन निर्णयानुसार विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अनुदानीत महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर (प्रयोगशाळा सहाय्यक) रिक्त पदांची पदभरती करण्याकरीता मान्यता दिलेली आहे, त्या अनुषंगाने महाविद्यालयात रिक्त असलेल्या पदांना शासन निर्णय दि. ०५.१२.२०१८, १९.१२.२०१८ व दि. ०७.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांचे पदमान्यतेसह व उपकुलसचिव महाविद्यालयीन विभाग यांच्या अद्यावत ना हरकत प्रमाणपत्रासह बिंदुनामावलीचा प्रस्ताव तयार करुन खालील नमुद केलेल्या वेळापपत्राप्रमाणे विशेष मागासवर्ग कक्षात प्राथमिक तपासणी करिता सादर करावे, दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे बिंदूनामावली प्रमाणीत करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोद घ्यावी. याबाबतचा अहवाल मा. सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग यांचे कार्यालयात पाठविण्यात येईल.

| अ.क्र | जिल्हा | बिंदुनामावली तपासणीचा दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | चंद्रपूर | २१.०१.२०१९ | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत | विशेष मागासवर्ग कक्ष, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली |
| २ | गडचिरोली | २२.०१.२०१९ | | |

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रत माहितीकरीता:-** १. स्विय सहाय्यक, मा. कुलगुरु यांचे कार्यालय, गो. वि. गडचिरोली
२. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३. मा. सहाय्यक आयुक्त (मा.व.क), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर
४. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर
५. उपकुलसचिव, महाविलयीन विभाग, गो. वि. गडचिरोली